ISO 9001 : 2015
ISO 14001 : 2015
ISO 27001 : 2013
ISO 45001 : 2018

# जवाहरलाल नेहरु पत्तन प्राधिकरण
# JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY

जनेप प्राधिकरण
JNPA

पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई - 400707. Port Office : Administration Bldg., Sheva Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 : मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 :
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191 : मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 :
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081 : मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171 : हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • Email : info@jnport.gov.in

क्रमांक: जेएनपीए/ वाढवण/२०२४/ १६०२ तारीख: २५/०१/२०२४

प्रति,

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB),
एमआयडीसी कॉलनी, तारापूर,
पालघर जिल्हा, महाराष्ट्र राज्य - ४०१५०४

विषय: पालघर जिल्ह्यात विनाशकारी प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार, शेतकरी, आदिवासी आदी भूमिपुत्र देशोधडीला लागणार असून पर्यावरणावर आणि पर्यावरणावर अवलंबून राहणा-या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या जन सुनावणीच्या माध्यमातून सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहलावावर हरकती नोंदवून वाढवणं बंदर उभारणी कायमचे रद्द करण्याबाबत Clarification to the Major query raised by participant reg. Public herring.

संदर्भ: नितेश नामदेव आरेकर यांचा अर्ज दि १७.०१.२०२४

आदरणीय महोदय,

आपण सादर केलेल्या हरकतींचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नितेश नामदेव आरेकर यांचा अर्ज दि १७.०१.२०२४ | हरकतींचा खुलासा |
|---|---|---|
| १. | वाढवणं बंदरामुळे अणुशक्ती केंद्राला धोका पालघर जिल्ह्यात दोन दशकांपासून कार्यरत असलेल्या तारापूर अणुऊर्जा केंद्र हे प्रस्तावित वाढवणं बंदरापासून किमान १० किमी अंतरावर असून सदर बंदरामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार आहे तसेब पर्यावरणीय विपरीत परिणाम सुद्धा ह्या अणुऊर्जा केंद्राला होणार आहे.<br>(अ) पर्यावरणीय धोका:- बंदराच्या ब्रेक वॉटर मुळे ब्रेक वॉटर व्यादक्षिणेला म्हणजेच अणुशक्ती केंद्राच्या भागात वाळू संचय होणार आहे ज्या मुळे भविष्यात | प्रस्तावित वाढवण बंदर TAPS च्या आपत्कालीन नियोजन क्षेत्राच्या 16 किमी अंतरावर TAPS पासून 11 ते 12 किमी अंतरावर आहे.<br>प्रस्तावित बंदर प्रकल्पाचा TAPS च्या आपत्कालीन नियोजन क्षेत्रावर अगदीच किरकोळ परिणाम होऊ शकतो परंतु तो EPZ मध्ये राहणाऱ्या स्थानिक लोकसंख्येसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करेल या संदर्भात सखोल तपशील खलील प्रमाणे आहे.<br>✓ एईआरबी आणि न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनपीसीआयएल) यांच्याशी चर्चा |

| | | |
|---|---|---|
| | अणुशक्ती केंद्र जिथून पाणी ओढून घेते त्यात गाळ साचणार आहे ज्या साठी सतत गाळ काढावा लागणार आहे. शिवाय पावसाळ्यात वादळ सुटले असता गाळ काढता येणार नाही अश्या भयानक परिस्थिती उद्धभवत्यामुळे अणुऊर्जा केंद्रावर विपरीत परिणाम होणार<br><br>अणुशक्ती केंद्र सखल भागात आहे. परिणामी त्याच्या जवळ एवढं मोठं भराव झाल्यास चक्रीवादळे, मोठी भरती आणि अतिवृष्टी एकत्र झाल्यास अणुशक्ती केंद्राला धोका निर्माण होऊ शकतो. क्लायमेट सेंट्रल ह्या संस्थेनं तयार केलेल्या नकाशात २०५० पर्यंत समुद्राचे पाणी अणुशक्ती केंद्राला लागणार असल्याचे दिसत आहे. अश्या वेळी एवढा मोठा भराव त्याच्या अगदी जवळ केल्यानं देशाची आर्थिक राजधानी देखील धोक्यात येईल.<br>(आ) सुरक्षेचा धोका : सदर प्रस्तावित बंदर अणुऊर्जा केंद्रापासून किमान १० कि.मी अंतरावर असल्याने भारतीय नौसेना, भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय गुप्तचर विभागांना माहितीच्या अधिकारांतर्गत ह्या बंदरामुळे होणाऱ्या जोखीमीचे मुल्यमापन केले असल्यास स्याचा अहवाल देण्यात यावा. आश्चर्य म्हणजे असं कुठलाच अहवोले बनविण्यात आला नसल्याचा खुलासा सुरक्षा यंत्रणांकडून करण्यात आला. त्यामुळे अणुऊर्जा केंद्राच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून जर का हे बंदर झाले तर मुंबईचे हिरोशिमा होणार हे निश्चित. (इ) | केल्यानंतर, टीएपीएसची सुरक्षा आणि सुरक्षितता तपासणे आवश्यक आहे असे ठरविण्यात आले आणि त्यानुसार एनपीसीआयएल, टीएपीएस यांच्या सहाय्याने पुढील अभ्यास केले गेले आणि त्यांना देण्यात आले. :-<br>✓ अवसादन वाहतूक अभ्यास आणि सीडब्लूपीआरएस द्वारे सेवन आणि आउटफॉलच्या आसपासच्या गाळावर परिणाम करणाऱ्या अवसादन पॅटर्नमधील बदलासह.- पूर्ण.<br>✓ वाढवण बंदराजवळ ऑइल स्लिकचा परिणाम आणि तारापूर साइटवर INCOIS, हैदराबाद -पूर्ण .<br>✓ M/s. SVC मरीन सर्विसेस प्रा.लि. द्वारा TAPS साइटजवळ ड्रिलिंग / जहाजांच्या टक्कर होण्याची संभाव्यता आणि परिणामाशी संबंधित अभ्यास - पूर्ण.<br>✓ औद्योगिक विकास/साठवणूक /रसायन/ स्फोटक द्रव्ये हाताळणे इत्यादींमुळे नैसर्गिक वाढ झोन (5 किमी पर्यंत) आणि TAPS च्या आपत्कालीन नियोजन क्षेत्र (16 किमी पर्यंत) मधील बदलांच्या परिणामाशी संबंधित अभ्यास फाईन एन्व्हायरोटेक व्दारे केला आहे.<br>वरील बाबी लक्षात घेता, गुप्तचर एजन्सींनी सांगितलेल्या सुरक्षेचा विचार पूर्णतः संबोधित करण्यात आला आहे आणि AERB च्या विचारासाठी AERB कडे पाठवण्यात आला आहे. त्यानुसार, प्रस्तावित वाढवण बंदराच्या विकासासाठी अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव यांनी 2019 मध्ये व्यापक सहमती जारी केली. |

| | | |
|---|---|---|
| | अणुऊर्जा विभागाकडून ना-हरकत दाखल्यावरून अस्पष्टता : माहितीच्या अधिकारानंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीला अणुऊर्जा विभागातील केंद्रीय सचिवांनी सशर्त परवानगी दिली आहे परंतु माहितीच्या अधिकारांतर्गत अणुऊर्जा विभागाला माहिती मागितली असल्यास प्रस्तावित वाढवण बंदराला कसलीच परवानगी देण्यात आली नसल्याचा खुलासा करण्यात आला आहे. त्यामुळे अणुऊर्जा विभागाकडून नक्की काय करण्यात आले आहे ह्याची स्पष्टता नसल्याचे आढळून आले आहे.<br>तरी, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रकल्पाला स्थानिकांकडून कडाडून विरोध असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या उपरोक्त विषयानुषंगे जन सुनावणीला मी हरकत नोंदवित असून प्रस्तावित वाढवण बंदर उभारणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी देऊ नये आणि ह्या बंदराला कायमचे रद्द करण्याची विनंती ह्या हरकती निवेदनाद्वारे करण्यात येत आहे. ह्याची नोंद महोदयांनी घ्यावी, हि नम्र विनंती. | सदर सहमतीच्या बळावर केंद्रशासनाने वाढवण पोर्ट साठी १३/०२/२०२०<br>मध्ये तत्वत: मान्यता दिलेली आहे व १९/०२/२०२० रोजी मेजर पोर्ट म्हणून अधिसूचना प्रकाशीत केली आहे. |

हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर महत्वाचा असून मा. प्रधानमंत्री कार्यालयाच्या स्तरावर देखरेख ठेवली जात असल्याने या प्रकल्पाची शिफारस लवकरात लवकर पुढील मंजुरीसाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयकडे करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

हे पत्र अध्यक्ष (प्रभारी) यांच्या मान्यतेने जारी केले जाते.

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत

उप महाव्यवस्थापक (पयोवी)